# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### पुणे शहरातील विश्रांतवाडी भागातील वसतिगृह बांधून पूर्ण होऊनही कार्यन्वित न झाल्याबाबत

**(१) ४५ (२४-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील विश्रांतवाडी भागात ५०० विद्यार्थी क्षमता असलेले वसतिगृह सन २०२१ मध्ये बांधून पूर्ण झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतिगृहाची इमारत बांधून तीन वर्ष होऊन देखील वसतिगृह माहे जानेवारी, २०२५ अखेरपर्यंत कार्यान्वित होऊ शकले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसतिगृह प्रवेशास विलंब होण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२७-११-२०२५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) पुणे शहरातील विश्रांतवाडी भागात १००० मागासवर्गीय मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह युनिट क्र. ३ व ४ ची इमारत हस्तांतरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याने सदर वसतिगृहाची इमारत ताब्यात घेण्यात आलेली नव्हती, तथापि विद्यार्थी हितास प्राधान्य देवून भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याच्या अटीवर इमारत ताब्यात घेवून वसतिगृह सुरु करण्यात येत असुन, युनिट क्र. ३ व ४ येरवाडा, पुणे या दोन्ही वसतिगृहातील प्रवेश प्रकिया सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(२) ८० (०१-०५-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेला पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य धरणांपैकी भातसा धरण, शहापूर पिसे धरणातून आलेल्या पाण्यावर फिल्ट्रेशन करुन दिल जाणारे दुषित पाणी नागरिकांना मिळत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खडवली, भादाणे, आतकोली, आरांजोनोली या सर्व गावातील जनावरांचे मलमुत्र, शेण, अर्धवट जळालेले मृतदेह या सर्वांचे मिश्रण असलेले दुषित पाणी, पंपींग स्टेशनला पुरविले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात दुषित पाण्याचे स्त्रोत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास गंभीर परिणाम होण्याची

शक्यता असल्याने सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०७-२०२५) :** (१) खरे नाही.
(२) खरे नाही.
(३) ठाणे महानगरपालिकेमार्फत भातसा धरणातील पिसे बंधाऱ्यातून २५० द.ल.लि प्रती दिन कच्चे पाणी उचलून या पाण्यावर ठाणे महानगरपालिकेच्या टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्रात शुध्दीकरण्याची प्रक्रिया केल्यानंतर, शुध्द पाणी ठाणे महानगरपालिका हद्दीत वितरित करण्यात येते. सदर पाण्याचे नमुने दररोज ठाणे महानगरपालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाच्या प्रयोगशाळेत तपासण्यात येतात.

ठाणे शहरात दुषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहिल्यानगर जिल्ह्यातील पिंपळगाव माळवी तलावाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३) २९९ (०१-०५-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे १०८ वर्षीय ब्रिटिशकालीन पिंपळगाव माळवी तलावाची महापालिकेच्या उदासीन भूमिकेमुळे अत्यंत दुरवस्था झाली असून, तलाव परिसरात बेसुमार अवैध पाणीउपसा, मोठ्या प्रमाणात वृक्षतोड, अवैध गौण खनिज उत्खनन, घाणीचा विळखा, भरावावर बाभळींच्या झाडांचे साम्राज्य निर्माण झाल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तलावाच्या दुरवस्थेला जबाबदार असणाऱ्या संबधितावर कार्यवाही करण्यासह तलावाच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

१. सन १९८५ पासून सदर तलावातील पाण्याचा पिण्यासाठी तत्कालीन नगरपालिका व महानगर-पालिकेमार्फत वापर केला जात नाही.

२. सदर तलावाचे बुडीत क्षेत्रात डोंगरगण, मांजरसुंबा पिंपळगाव माळवी व आढाववाडी गावाकरीता सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी उद्भव विहीर घेण्यास स्थायी समिति, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे मंजुरीने यापूर्वी परवानगी देण्यात आलेली आहे.

३. महानगरपालिका पाण्याचा वापर करीत नसल्याने, तलावाच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांना तलावातील पाणी उचलणेबाबत महानगरपालिकेने रीतसर परवानगी दिलेली आहे.

४. तलावातील ज्या ठिकाणातील पाणी संपलेले आहे अशा ठिकाणाहून माती/ पोयटा बिना मोबदला काढून घेणेबाबत महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन देखील केलेले आहे, जेणेकरुन गाळ निघून तलावाची क्षमता वाढेल.

(२) अ) पिंपळगाव माळवी पाणी पुरवठा केंद्र येथील पंपींग मशिनरी साहित्याची चोरी झालेबाबत, एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अहिल्यानगर यांचेकडे प्रथम खबर क्र.०४१०, दिनांक १० जून, २०२२ अन्वये

अनोळखी इसमा विरुद्ध रीतसर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ब) पिंपळगाव माळवी तलावातील झाडांची कत्तल (चोरी) झालेबाबत एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, अहिल्यानगर यांचे कडे प्रथम खबर क्र.०३७०, दिनांक २५.०५.२०२२ अन्वये संबंधिता विरुद्ध रीतसर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

क) पिंपळगाव माळवी तलावा लगत होत असलेल्या अवैध उत्खनना बाबत एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, अहिल्यानगर यांना इकडील जा.नं. ६६५, दिनांक १९.०९.२०२४ अन्वये अज्ञात इसमा विरुद्ध कारवाईबाबत कळविण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोडबंदर रोड (जि.ठाणे) परिसरातील पाण्याची टंचाई दुर करण्याबाबत**

**(४) ४६० (२७-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील घोडबंदर रोड भागातील नागरीकांना पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असतांना टँकर चालकांना मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्याने घोडबंदर येथील रहिवाशांनी दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास अतिरिक्त आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, घोडबंदर भागाचे वाढते नागरीकरण आणि प्रचंड लोकसंख्येचा विचार करता, येथील नागरीकांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच पाणी टंचाई असतानादेखील टँकर चालकाना पाणी पुरवठा मुबलक प्रमाणात पुरविण्याऱ्या दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०७-२०२५) :** (१) खरे आहे.

घोडबंदर रोड भागातील वाघबीळ परिसरातील सोसायटीच्या प्रतिनिधींनी मा.खासदार श्री.नरेश म्हस्के यांचे समवेत घोडबंदर येथील समस्यांविषयी अतिरिक्त आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे.

(२) घोडबंदर भागात पाणीपुरवठ्याच्या नियोजनाचा भाग म्हणून १५ दिवसातून एकदा सोमवार व मंगळवार या दिवशी १२ तासांकरिता पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येतो. तदनंतर १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. सदर कालावधीत ठाणे महानगरपालिकेमार्फत मोफत टँकर देण्यात येतात. तसेच, काही सोसायटी शुल्क भरून व खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध करून घेतात.

(३) घोडबंदर भागातील वाढत्या नागरिकीकरण व लोकसंख्येसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ५० द.ल.लि. प्रतिदिन पाणीपुरवठा होणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता, त्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून घोडबंदर भागासाठी ५ द.ल.लि. प्रतिदिन अतिरिक्त पाणीपुरवठा दिनांक ०२.०४.२०२५ पासून सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे घोडबंदर भागातील पाणीपुरवठ्यात काही अंशी सुधारणा झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी शहरातील नागरीकांना पाणीपट्टीचे जुन्या जोडणीचे व नवीन जोडणीचे सरसकट देयके दिल्याबाबत

**(५) ५९९ (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील नागरीकांची पाणीपट्टी कराची वसुली होण्यासाठी शास्ती सूट अभय योजना महापालिका प्रशासनाने सुरु केल्यानंतर या योजनेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असतांना सन २०२१ ते २०२४ पर्यंतच्या संपूर्ण तीन वर्षाची नळपट्टी एकदाच देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील विविध भागातील अनेक नागरिकांना नळ जोडणी करतांना मीटर बसविणे बंधनकारक केले असतांना ज्या नागरीकांनी सदर मीटर जोडणी करुन घेतली व ज्यांनी मीटरची जोडणी घेतलेली नाही अशा दोघांनाही सरसकट समान रक्कमेचे देयके देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच काहींना जुन्या जोडणीचे व नवीन जोडणीचे असे दोन्हीही देयके प्राप्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन परभणी शहरातील नागरीकांवर होणारा अन्याय दूर करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०८-२०२५) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी परभणी शहर महानगरपालिकेकडून शहरात UIDSSMT नंतर अमृत योजने अतर्गत शहरातील विविध भागात जलकुंभ उभारणी व पाणी वितरण व्यवस्थेसाठी पाईप लाईन अंथरण्याचे काम करण्यात आलेले आहे.

सन २०२३-२४ या कालावधीपासून पाणी पट्टीची मागणी बिल वाटप करण्यात आलेली आहेत. यामुळे परभणी शहर महानगरपालिकेमार्फत नागरीकांना पाणी पट्टी  विलंबशास्तीत ५० ते १०० टक्कयांपर्यत सुट देवून अभय योजना राबवुन पाणी पट्टीची वसुली करण्यात येत आहे. तसेच प्रकरण निहाय तपासणी करुन नागरीकांवर अन्याय होणार नाही यांची दक्षता महानगरपालिकेमार्फत घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) येथे फुटपाथवर व मोकळया जागेत अनधिकृपणे व्यवसाय सुरू असल्याबाबत

**(६) ७७८ (२७-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) शहरी व ग्रामीण भागात अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने नागरीकांना विशेषत: महिलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फुटपाथवर व मोकळया जागेत जागोजागी फळ विक्रेते, भाजी विक्रेते, चायनीज हातगाडया, मटन शॉप व धाबे अनधिकृतपणे सुरू असल्याने अनेक सामाजिक संस्था आणि नागरीकांनी संबंधित विभागाकडे तक्रारी करुनही संबधित विभागातील अधिकाऱ्याशी फेरीवाल्याचे आर्थिक हित संबध असल्यामुळे कारवाई करणाऱ्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे नियमित कर भरणाऱ्या अधिकृत दुकानदारांच्या व्यवसायांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अवैधपणे फुटपाथवर व मोकळया जागेत व्यवसाय करणाऱ्या व्यवसायीकांसह व तक्रार करुनही फेरीवाल्यावर कारवाई करणाऱ्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
काही ठिकाणी अनधिकृत फेरीवाल्यांमुळे नागरिकांना त्रास होतो. पनवेल महानगरपालिका अतिक्रमण पथकामार्फत फेरीवाल्यांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
(२) खरे नाही.
पनवेल महानगरपालिका अंतर्गत महानगरपालिकेने विहित प्रक्रियेचा अवलंब करून फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र घोषित केलेले असून परवानाधारक फेरीवाला यांना अधिकृत फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करण्यास मज्जाव नाही. तथापि, महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनधिकृत फेरीवाले/हातगाडी व्यावसायिक यांचेवर वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, चारही प्रभागामध्ये आज पावेतो अनधिकृत आठवडे बाजार व फेरीवाले (हातगाड्या) यांचेकडून वेळोवेळी उचित दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, महानगरपालिकेमार्फत अतिक्रमण फेरीवाल्यांविरुद्ध धडक मोहीम सुरु आहे.
(३) खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) महानगरपालिकेला मालमत्ता कर अभय योजनेद्वारे शास्ती माफ करण्याबाबत

**(७) ७८० (२८-०४-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) महानगरपालिकेला अभय योजनेद्वारे शास्ती माफ करावी व ज्यांनी या अगोदर शास्ती सहित मालमत्ता कर भरला आहे त्यांची सुद्धा अभय योजनेद्वारे शास्ती माफ करून ती रक्कम येणा-या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करातून वगळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक १७ मे, २०२४ रोजी झालेल्या आदेशाप्रमाणे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना सन २०२१-२०२२, २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर भरण्याचे आदेश केलेले असून सदर मालमत्ता करावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत

शास्ती लावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेत अभय योजनेद्वारे शास्ती माफ करण्यात आली आहे, त्याच धर्तीवर पनवेल महानगरपालिकेला अभय योजनेद्वारे शास्ती माफ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०७-२०२५) :** (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) व (४) महानगरपालिकेने लावलेल्या मालमत्ता करासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिका क्र.१०८४९/२०२३ वर मा.सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम निर्णय दिनांक २९.४.२०२४ रोजी दिला असून दिनांक १.१०.२०१६ ते दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंतच्या मालमत्ता करावरील शास्तीची रक्कम वगळता पूर्ण मालमत्ता कराचा भरणा दोन महिन्याच्या आत करण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने देयकामध्ये सुधारणा करून सर्व मालमत्ता धारकांना देयके बजाविण्यात आली होती. त्यानुसार काही मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केलेला आहे.

ज्या मालमत्ता धारकांनी विहित वेळेत मालमत्ता कराचा भरणा केला नाही त्या मालमत्ता धारकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ८ नियम ४१ अन्वये थकीत मालमत्ता कराच्या रकमेवर प्रतिमाह २ % शास्ती दिनांक १.४.२०२५ पासून आकारण्यात आलेली आहे.मा.सर्वोच्च्य न्यायालयाच्या दिनांक २९ एप्रिल, २०२४ रोजीच्या अंतरिम निकालानुसार सन २०१६-१७ ते सन २०२०-२१ या कालावधीच्या मालमत्ता करावरील शास्तीच्या दरासंबंधीचा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयावेळी देण्यात येणार आहे. सबब, शास्ती विषयक बाब मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाधीन असल्याने शास्ती माफीबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

## कुळगाव बदलापूर (जि. ठाणे) नगरपालिकेमध्ये शिलाई मशीन व घरघंटी वाटपात झालेला गैरव्यवहार

**(८) ९६० (०१-०५-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव बदलापूर (जि. ठाणे) नगरपरिषदेमध्ये शिलाई मशीन व घरघंटी वाटपात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशी पूर्ण होईपर्यंत घरघंटी व शिलाई मशीन यांचे वाटप करु नये अशी स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी असताना देखील दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास नगरपरिषदेमार्फत शिलाई मशीन व घरघंटी यांचे वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन स्तरावरुन उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक तसेच महिला व बालविकास अधिकारी श्री. निकुले व इतर सर्व संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील महिलांना प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या

माध्यमातून शिलाई मशिन व घरघंटी यंत्रासाठी पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांनी घरघंटी किंवा शिलाई मशिन खरेदी करुन त्याचे देयक सादर केल्यानंतर थेट लाभ हस्तांतरण (DBT) पध्दतीने रक्कम अदा करण्याचे निर्देश अध्यक्ष, नियामक परिषद, जिल्हा खनिज प्रतिष्ठान तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिले आहेत. त्यानुसार लाभार्थ्यानी घरघंटी किंवा शिलाई मशिन खरेदी देयक सादर केल्यानंतर थेट लाभ हस्तांतरणाची कार्यवाही करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) योजनेच्या मार्गदर्शक सूचना व निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम करण्यात आली आहे. तथापी, अदयापपर्यंत निधीचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) येथील महिलांना प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत शिलाई मशीन व घरघंटी खरेदी करिता मंजुरी दिल्याबाबत

**(९) ९६१ (०१-०५-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील महिलांना सक्षम व स्वावलंबी करण्याकरिता प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत दिनांक २८/ २/ २०२४ रोजी २ कोटी ५० लाख ५३ हजार रुपयांच्या ८०० शिलाई मशीन व ६९० घरघंटी खरेदी करिता प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधानमंत्री खनिजक्षेत्र कल्याण निधी वापरत असताना महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक डी एम एफ ०६२२/प्र क्र ५७ / उ -९ मंत्रालय मुंबई या शासन निर्णयातील अटी व शर्ती व नियमांचे उल्लंघन केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय निष्पन्न झाले, त्यानुसार, सदरचा निधी शासन निर्णयातील अटी व शर्ती व नियमांचे पालन न करता गैरमार्गाने व बेकायदेशीरपणे इतरत्र वर्ग करणाऱ्या संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०८-२०२५) :** (१), (२) व (३) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील महिलांना प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या माध्यमातून शिलाई मशिन व घरघंटी वाटप करण्यासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान, ठाणे यांचे दिनांक २८/०२/२०२४ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यतेसह नगरपरिषदेस निधी वितरीत केला आहे.

महिला सक्षमीकरण व शाश्वत रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देश्याने महिलांना घरघंटी व शिलाई मशिन योजनेचा लाभ घेण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊन इच्छुक महिलांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

प्राप्त अर्जाच्या छाननीअंती पात्र अर्ज संख्या व लाभ द्यावयाच्या यंत्रांची संख्या व्यस्त प्रमाणात असल्याने संगणकीय सोडत पद्धतीने लाभार्थी निवड करणे विधीसंगत असल्याने व लाभार्थी महिलांच्या निवडीबाबत पारदर्शकता राखण्याच्या दृष्टिकोनातून मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. समितीने योजनेच्या मार्गदर्शक सूचना व निकषांनुसार लाभार्थ्यांची निवड केली असून थेट लाभ हस्तांतरण (DBT) धोरणानुसार निधी वितरीत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खानापूर (जि.सांगली) नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये पुरातन विभागाच्या नियमावलीमुळे परिसरात बांधकाम करण्यास मज्जाव असल्याबाबत

**(१०) ११२१ (०१-०५-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये पुरातन विभागाच्या नियमावलीमुळे परिसरात बांधकाम करण्यास मज्जाव करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात बांधकाम करण्यास मज्जाव करण्यात आल्यामुळे नगरपंचायत हद्दीतील जुन्या व मोडकळीस आलेल्या घराचे बांधकाम करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने बांधकामास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

खानापूर नगरपंचायत हद्दीत मोहम्मद तुघलक दर्गा हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक अस्तित्वात आहे. प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष (सुधारणा आणि प्रमाणीकरण) अधिनियम, २०१० नुसार सदर स्मारकापासून १०० मी. अंतराचा परिसर हा प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित असून यामध्ये कोणतेही खोदकाम अथवा बांधकाम करता येत नाही. तसेच सदर स्मारकापासून १०० ते २०० मी. अंतराचा परिसर हा नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित असून सदर क्षेत्रात खोदकाम किंवा बांधकाम सुरु करण्यापुर्वी पुरातत्व खात्याकडून मंजूरी घेणे आवश्यक आहे.

(३) उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार स्मारकापासून १०० ते २०० मीटर अंतराचा परिसर हा नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित असून सदर क्षेत्रात बांधकाम परवानगी अर्जावर केंद्रीय पुरातत्व खात्याकडून मंजुरी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येते. या भागाव्यतिरिक्त नगरपंचायत हद्दीतील इतर भागांमधील बांधकामाबाबत नगरपंचायतीकडून नियमांनुसार परवानगी देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात शेरीनाला सांडपाणी प्रक्रिया करण्याकरिता महानगरपालिकेने पाठविलेल्या प्रस्तावाबाबत

**(११) १३९९ (०१-०५-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हात शेरीनाला सांडपाणी प्रक्रिया करण्यासाठी ९३ कोटी रुपयांचा प्रस्ताव महापालिकेने शासनाकडे पाठविला असून तो मंजूर करण्यासाठी महापालिकेने शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी जनतेकडून होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास मंजूरी मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२) व (३) नगरोत्थान महाभियानांतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील वखारभाग ट्रक पार्किंग येथे मलशुद्धीकरण केंद्र बांधणे व इतर आनुषंगिक कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल महानगरपालिकेने तयार केला असून त्यास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे विभाग यांनी रुपये ९३.५० कोटी किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर प्रस्ताव महानगरपालिकेने सदर अभियानाच्या विहित कार्यपद्धतीनुसार शासनास सादर केलेला आहे.

---

**वसई-विरार (जि. पालघर) शहरात खाजगी रूग्णालयांकडून शासनाचे नियमाचे उल्लंघन करुन रुग्णांकडून अतिरिक्त शुल्क आकारत असल्याबाबत**

**(१२) १४१८ (२५-०४-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार (जि.पालघर) शहरात महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार पालिकेकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान ३४५ खाजगी रूग्णालयांनी नोंदणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी त्यांचे संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रकाशित केलेली रूग्णांच्या हक्काची सनद व दरपत्रके आरोग्य यंत्रणेमार्फत प्रत्येक लॅबोटरीज, पॅथॉलॉजी व रूग्णालयाना लागू करून दर्शनी भागावर लावण्याचे परिपत्रकाव्दारे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व), जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व), जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व) तसेच वैद्यकीय अधिकारी (सर्व) यांना रूग्णांच्या हक्काची सनद व दरपत्रकाबाबतच्या नियमांचे पालन करण्याचे आदेश सहसंचालक, आरोग्य सेवा, (रूग्णालय) राज्यस्तर, मुंबई यांनी दिनांक १०/०१/२०२२ चे परिपत्रकाव्दारे दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसई-विरार शहर म.न.पा.अंतर्गत येणाऱ्या बहुतांश सर्व खाजगी रूग्णालयांकडून आदेश व नियमाचे उलघंन करुन रुग्णाकडून जास्त पैसे घेतले जात आहे, हे खरे आहे काय.

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रूग्णालयांवर योग्य कारवाई करून गोरगरीब जनतेस चांगल्या व माफक दरात वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे,

(२) हे खरे आहे,

(३) हे खरे आहे,

(४) व (५) महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१ मधील नियम ११ (क्यू) मध्ये रुग्णालयाच्या दर्शनी भागात “रूग्ण हक्क संहिता” फलक लावण्यात यावे असे नमूद आहे. त्यानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी रूग्णालये / शुश्रुषागृह यांना दिनांक ३१ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये “रुग्ण हक्क संहिता” फलक लावण्याबाबत तसेच या तरतूदींचे पालन करण्याबाबत कळविण्यात आले आहे

उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ यांच्या दिनांक ०७ जानेवारी, २०२५ रोजीच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ३५१ नोंदणीकृत रूग्णालयांची तपासणी करणेकरिता महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची ८ पथके नेमण्यात आली होती. या पथकांद्वारे दिनांक ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ३५१ रूग्णालयांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये सर्व रूग्णालयांनी रूग्णहक्क संहिता व दरपत्रके दर्शनी भागात लावले असल्याचे निदर्शनास आले आहे.

जे खाजगी रूग्णालय आदेश व नियमांचे उल्लंघन करून रूग्णांकडून जास्त पैसे घेतील अशा रूग्णालयांवर महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१ नुसार कारवाई करण्यात येत आहे.

---

## रायगड जिल्ह्यातील वाढते वायु व जलप्रदुषण रोखण्यासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याबाबत

**(१३) १७३१ (०१-०५-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील बहुतांशी ग्रामपंचायती, नगरपंचायत, नगरपालिका डंपिंग ग्राउंड उपलब्ध नसल्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील वाढत्या कच-याची समस्या दिवसेंदिवस वाढत असुन वायु व जल प्रदुषणातही मोठया प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवासी घरे, उपहार गृहे, छोटे-मोठया कंपन्या, कारखाने, विकास बांधकामे, आदितून दररोज लाखो टन कचरा निर्माण होत असून कचऱ्याचे निर्मुलन करण्यासाठी जिल्ह्यात सक्षम यंत्रणा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रायगड जिल्ह्यातील वाढते वायु व जलप्रदुषण रोखण्यासाठी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी तातडीने सक्षम यंत्रणा निर्माण करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) रायगड जिल्हयातील अलिबाग नगरपरिषद वगळता इतर सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतीकडे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता पुरेशी जागा/ डंपिंग ग्राऊंड उपलब्ध आहेत. अलिबाग नगरपरिषदेस कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपलब्ध असलेली जागा अपूरी पडत असल्याने घनकचरा व्यवस्थापनाकरीता वाढीव जागेच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांनी शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी यांना मूळ सेवेत पाठवून नाशिक शहरातील खाजगी हॉस्पिटलची नोंदणी व नूतनीकरण ऑनलाईन करण्याबाबत

**(१४) १९०६ (०१-०५-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी श्री. तानाजी चव्हाण हे अत्यंत अकार्यक्षम असल्यामुळे त्यांना

मूळ सेवेत पाठवून त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर प्रलंबित राहिलेल्या खाजगी रुग्णालयांची नोंदणी व नूतनीकरण करण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२५) :** (१) अशंत: खरे आहे.
(२) त्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेतर्फे ऑनलाईन सॉफ्टवेअर बनवण्यात आलेले असुन ऑफलाईन प्रणालीव्दारे नोंदणी/नूतनीकरण दिनांक १५.०४.२०२५ रोजी सुरू करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर (जि. ठाणे) शहर महानगरपालिकेची आर्थिकस्थिती बिकट असल्याबाबत**

**(१५) १९१९ (०१-०५-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी निजामपूर (जि. ठाणे) शहर महागनरपालिका ही "ड" वर्गात येत असून वाढती लोकसंख्या, यंत्रमाग, छोटे मोठे उद्योग, कंपन्या, वस्त्रोद्योगातून कराच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनास महसूली उत्पन्न दिले जात असूनही पालिकेच्या गैरकारभारामुळे महानगरपालिकेवर कर्जाचा बोजा वाढला असल्याचे माहे जुलै, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगर पालिकेची आर्थिक स्थिती बिकट झाल्याने शहरातील नागरीकांना मुलभूत सोई सुविधा पुरविणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महानगर पालिकेने बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पाण्याचे, स्टेम कंपनी प्रा.लि. थकीत हप्ते व पाण्याचे, एम.एम.आर.डी.ए.च्या कर्जाच्या हप्त्याची रक्कम व भिवंडी निजामपूर शहरातील आरोग्य विभागातील कंत्राटदाराची देयेक अशी अनेक देयकांची रक्कम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त देयकांची रक्कम महानगर पालिकेवरील वाढत्या कर्जामुळे देणे शक्य नसल्याने शासनस्तरावरुन उपाययोजना करून कार्यवाही होण्याबाबत लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २३ जुलै, २०२४ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महानगर पालिकेची आर्थिक स्थिती बिकट असतानाही पालिकेच्या ठेवी मोडण्यात येवून त्यांचा गैरवापर करण्यात आला असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने महानगर पालिकेची प्रलंबित देणी भागविण्याकरीता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०८-२०२५) :** (१) व (२) खरे नाही
(३) व (४) खरे आहे,
तथापि, मागील ६ महिन्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पाणी देयक रू.१२,७५,००,०००/-, स्टेम कंपनीचे रू.१५,२९,००,०००/- व एम.एम.आर.डी.ए. च्या रू.५,५२,५४,९२९/- इतक्या हप्त्याची देयके अदा केलेली आहे.

तसेच आरोग्य विभागातील कंत्राटदारांची मंजूर झालेली देयके प्रदानाकरिता महानगरपालिकेच्या लेखा विभागात प्रलंबित नसल्याचे आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(५) महानगरपालिकेच्या ठेवी मोडण्यात आलेल्या नसल्याचे आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नालासोपारा (जि. पालघर) आचोळे येथे उभारण्यात येणाऱ्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयाबाबत**

**(१६) २५५२ (०१-०५-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा (जि. पालघर) आचोळे येथे सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या बांधकामाकरिता शासनाने सन २०२३ मध्ये मंजुरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरिता शासनाने २५० कोटी इतका निधी मंजूर केला असून यापैकी रु.२५ कोटी इतका निधी वसई-विरार शहर महानगरपालिकेला वर्ग केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालयाची जमीन ही आजतागायत न्यायालयाच्या मालकीची असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रुग्णालयाची जमीन तातडीने महापालिकेच्या ताब्यात घेऊन वसई-विरार परिक्षेत्रातील नागरिकांना सोयी-सुविधा युक्त सुपर स्पेशालिटी रुग्णालय उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२५) :** (१) खरे आहे,
(२) अंशत: खरे आहे,
वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील आचोळे येथे मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल बांधण्याकरिता नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०८ जुलै, २०२४ अन्वये रू.२५० कोटी खर्चास मान्यता देण्यात आली असून प्रथम टप्प्यात रू.२५ कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, पालघर यांना वितरीत करण्यास मान्यता दिली आहे.
(३) खरे आहे,
(४) सर्व्हे क्र.६ मध्ये ९८०८ चौ.मी.जागा रुग्णालय इमारत बांधकामासाठी देण्याचा मागणी प्रस्ताव महापालिकेने दिनांक ०९ जून, २०२१, दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ व दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रकरणी महसूल विभागामार्फत कार्यवाही सुरू आहे. महसूल विभागाकडून जागा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई- विरार (जि. पालघर) परिक्षेत्रातील अमृत योजना टप्पा - २ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(१७) २५५३ (०१-०५-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई – विरार (जि. पालघर) महानगरपालिका क्षेत्रात अमृत योजना टप्पा-२ या पिण्याच्या पाण्याची योजना शासनाने मंजूर केली असतानाही अद्यापपर्यंत क्षेत्रातील नागरिकांना पूरेशा पाणी पुरवठा उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पाणी पुरवठासाठीच्या योजनेच्या माध्यमातून शहरात मुबलक पाणी उपलब्ध होत असतानाही योग्य पाणी वितरण यंत्रणे अभावी पुरेशा पाण्याची उपलब्धता होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वारंवार टँकरच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेचे काम महानगरपालिका व ठेकेदार यांच्यामार्फत अत्यंत संथ गतीने सुरु असल्यामुळे ही योजना पूर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी आणखीन तीन वर्ष लागण्याची शक्यता असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वसई- विरार शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरेशा पुरवठा होण्याच्या दृष्टीने अमृत योजना टप्पा - २ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या सूर्या ४०३ द.ल.लि. योजनेतून वसई विरार महानगरपालिकेस पाणी उपलब्ध झाले असून यामुळे शहरातील टँकरच्या मागणीत मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे.

(४), (५) व (६) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत वसई विरार शहराच्या रुपये ४९४.११ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर प्रकल्पांतर्गत कामाची वसई विरार महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया राबवून दोन पॅकेजमध्ये काम प्रगतीपथावर असून प्रकल्पाच्या कामाचा शासन स्तरावरून तसेच, महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून संपूर्ण प्रकल्पाचे काम डिसेंबर, २०२६ पर्यंत पुर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

---

## राज्यातील कंत्राटी कामगारांचे आर्थिक शोषण थांबवण्याबाबत

**(१८) २५९८ (०१-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व अ, ब, क, ड गटातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदेमध्ये कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार पगार न देता त्यांना सर्व सुविधांपासून वंचित ठेवले जात असल्याचे सामाजिक कार्यकर्ते यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महानगरपालिका नगरपरिषद व नगरपालिकांमध्ये दिनांक १ जानेवारी, २०२१ पासून

कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना स्थानिक स्वराज्य संस्थेने नेमून दिलेल्या ठेकेदारांनी किमान वेतन कायद्यानुसार अत्यंत तुटपुंजे वेतन बँकेद्वारे न देता रोख स्वरूपात देऊन त्यांचे आर्थिक शोषण करीत असल्याबाबत राज्य कामगार आयुक्तांनी चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार दोषी असलेल्या प्रशासन अधिकारी व ठेकेदारांवर शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यभरातील हजारो कंत्राटी कामगारांचे होणारे आर्थिक शोषण थांबवण्यासाठी शासन स्तरावर सक्षम संगणकीय प्रणाली राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
कामगार आयुक्त, मुंबई यांनी दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करण्याबाबत संबंधितांना कळविले आहे.
(३) कामगार विभागाच्या जिल्हा कार्यालयांमार्फत विविध कामगार कायद्यांतर्गत निरिक्षण शेरे पारित करण्यात आलेले असून त्रूटींची पुर्तता न केलेल्या कंत्राटदारांविरोधात न्यायालयामध्ये खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे, असे कामगार विभागाने कळविले आहे.
(४) राज्यातील नगरपंचायती / नगरपालिका / महानगरपालिकांमध्ये याबाबतीत सद्यस्थितीत संगणकीय प्रणाली नाही.
तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या परिपत्रकाव्दारे किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत राज्यातील नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या हद्दीमधील अनूसुचित रोजगाराच्या वर्गातील रोजगारावर असणाऱ्या कामगारांना किमान वेतन लागु करणेबाबत स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होत असल्याचे सर्व मुख्याधिकारी यांनी खात्री करणे आवश्यक असून याबाबत नियमानुसार कार्यवाही होत नसल्याचे आढळल्यास संबंधित मुख्याधिकारी व कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील असे देखील नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांच्या स्तरावरुन कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई विरार (जि. पालघर) महानगरपालिकेत कागदपत्रे ऑनलाईन उपलब्ध होत नसल्याबाबत

**(१९) २६२८ (०१-०५-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई विरार (जि. पालघर) महानगरपालिकेने बांधकाम परवानगी करता लागणारा झोन दाखला, वृक्ष परवानगी, ना हरकत दाखला, अग्नी सुरक्षा ना हरकत दाखला, घरपट्टी पावती अशी साधी कागदपत्रे ऑनलाईन उपलब्ध होत नसल्याने सामान्य नागरिकांना दररोज महानगरपालिकेच्या कार्यालयात चकरा माराव्या लागत असल्याने या योजना ऑनलाईन करण्याची मागणी नागरिकांकडून होत असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई विरार महापालिकेत च्या संकेतस्थळावर उक्त दाखले उपलब्ध करून देण्यासाठी

महानगरपालिकेने २०२२ मध्ये मान्यता देऊनही अद्याप ही सुविधा दिली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महापालिकेच्या संकेतस्थळावर उक्त दाखले उपलब्ध करुन देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०२५) :** (१) व (२) खरे नाही,

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (RTS) अंतर्गत सन २०१९ पासून एकूण १५ सेवा ऑनलाईन देण्यात येत आहेत. त्यामध्ये बांधकाम परवानगी करता लागणारा झोन दाखला व अग्नी सुरक्षा ना हरकत दाखल या सेवा अंर्तभूत होत्या. तसेच, सन २०२४ पासून RTS पोर्टल अद्यावत करून ५४ सेवा ऑनलाईन देण्यात येत असून, त्यामध्ये वृक्ष परवानगी ना हरकत दाखल या सेवेचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. सन २०१६ पासून घरपट्टी कर ऑनलाईन भरणा करण्याकरिता सेवा उपलब्ध करून देण्यात आली असून महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन नागरीक सेवेचा फायदा घेऊ शकतात असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाण्याच्या सीपी टैंक डम्पिंगवर वर्गीकरणासाठी येणारा शेकडो टन कचरा महिन्याभरापासून उचलला नसल्याबाबत**

**(२०) ३००० (०१-०५-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाण्याच्या सीपी टैंक डम्पिंगवर वर्गीकरणासाठी येणारा शेकडो टन कचरा महिन्याभरापासून उचलला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेकडो घंटागाडयाच्या रांगा सीपी टॅक परिसरात लागल्याने परिसरातील नागरिकांना प्रचंड दुर्गधीमुळे श्वसनाचा त्रास होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या डंम्पिगवर कचऱ्यांचे वर्गीकरणाचे काम बंद असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कचऱ्यांचे वर्गीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सीपी तलाव येथे हस्तांतरण स्थानक असून सदर ठिकाणी संकलित करण्यात आलेला कचरा मौजे डायघर येथील कचरा पूर्व प्रक्रिया केंद्रावर वर्गीकरणासाठी नियमितपणे हस्तांतरित करण्यात येतो.परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे मौजे डायघर येथील येथील घनकचरा पूर्व प्रक्रिया केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नव्हते. परिणामी सीपी तलाव येथे जानेवारी, २०२५ मध्ये काही प्रमाणात घनकचरा साचला होता ही वस्तुस्थिती आहे.

सीपी तलाव हस्तांतरण स्थानकातील नियुक्त कंत्राटदारासह तात्पुरत्या कालावधीसाठी अतिरिक्त कंत्राटदाराची नियुक्ती करून सदर हस्तांतरण स्थानकात साठलेला अतिरिक्त कचरा मौजे आतकोली येथे हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत सीपी तलाव येथे कचरा साचलेला नाही.

(२) खरे नाही.

सीपी तलाव परिसरातील रस्ते अरुंद असल्याने वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून हस्तांतरण स्थानकात येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांसाठी प्रवेश व निर्गमन यासाठी वेगवगळे मार्ग तयार करण्यात आलेले आहेत.तसेच वाहतुकीचे नियमन करण्यासाठी वाहतूक पोलीस व ट्रॅफिक वॉर्डनच्या मदतीने नियोजन करण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीत शहरामध्ये विकेंद्रित पद्धतीने तात्पुरते हस्तांतरण स्थानक सुरु करण्यात आलेले असल्याने सीपी तलाव हस्तांतरण स्थानकात येणाऱ्या घंटागाड्यांची संख्या कमी झाली आहे.

सीपी तलाव परिसरात नियमितपणे दुर्गंधीनाशक व जंतूनाशकाची फवारणी करण्यात येत आहे. तसेच हस्तांतरण स्थानकात उच्च क्षमतेचे दुर्गंधीनाशक स्प्रेईंग मशीन कार्यान्वित करण्यात येऊन प्रभावी दुर्गंधी प्रतिबंधक उपाय योजना करण्यात येत आहेत.

(३) सीपी तलाव हे हस्तांतरण स्थानक असून सदर ठिकाणी कचऱ्याचे वर्गीकरण होत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल(जि.रायगड) महानगरपालिका हद्दीत महानगर गॅस निगमच्या टाकण्यात आलेल्या पाईपलाईनमुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(२१) ३०१० (०१-०५-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) महानगरपालिका हद्दीत महानगर गॅस निगमच्या टाकण्यात आलेल्या पाईपलाईनमुळे नागरिकांना तसेच वाहन चालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिका हद्दीत ठिकठिकाणी पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाल्यावर रस्ते सुस्थितीत न केल्यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले असून रस्तांची दुरवस्था झाली असल्याने नागरिकांना मोठया वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनानी चौकशी करून महानगरपालिका हद्दीत महानगर गॅस निगमच्या पाईपलाईनमुळे खराब झालेले रस्ते सुस्थितीत करण्याबाबत तातडीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०७-२०२५) :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) महानगर गॅस पाईप लाईनचे काम पूर्ण झाल्यावर त्या-त्या रस्त्याची दुरुस्तीची कामे तातडीने महानगरपालिकेमार्फत करुन रस्ते सुस्थितीत आणण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगाव ( जि.नाशिक ) शहरात भुयारी गटाराच्या कामांकरिता अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आल्याबाबत

**(२२) ३०७५ (०१-०५-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) शहरात भुयारी गटाराच्या कामांकरिता खोदण्यात आलेल्या रस्त्यांची दुरुस्ती न केल्यामुळे सपाटीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामे अपुर्णावस्थेत राहिल्याने रस्त्याची दुरवस्था झालेली असल्याने जोपर्यत ठेकेदार सपाटीकरणाची कामे पूर्ण करत नाही तोपर्यत देयक अदा करु नये अशा सूचना स्थानिक लोकप्रतिनिधिंनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामे अर्धवट अवस्थेत ठेवण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्या ठेकेदारांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे,

मालेगाव शहरात टाकण्यात येणारी भुयारी गटारे ही प्राधान्याने ज्याभागात विविध योजने अंर्तगत नविन रस्त्याचे कामे मंजुर आहेत अशा भागात भुयारी गटार प्राधान्याने टाकण्यात येत असून निविदा अटीशर्ती नुसार मक्तेदाराकडून सदरचे रस्ते सपाटीकरण करुन वापरण्यास योग्य करुन घेण्यात येत आहे. व त्यानंतर लगेच विविध योजनेंर्तगत नविन मंजुर सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे काम सुरु करण्यात येत आहे.

तसेच ज्या भागात रस्ता कामे मंजूर नाही अश्या भागात टाकण्यात येणारी भुयारी गटारीमुळे खराब होणा-या रस्त्यांचे पॅचवर्कचे कामे तातडीने पूर्ण करणेकामी प्रभाग निहाय पथक तयार करण्यात आलेले असुन, रस्ता दुरुस्ती / रिपेअरचे कामे सुरु आहेत.

(२) अंशत: खरे आहे,

मा.विधानसभा सदस्य मालेगाव (मध्य) यांनी दिनांक २७ जानेवारी, २०२५ अन्वये महापालिकेस पत्र प्राप्त झालेले आहे. त्यात योजने संबंधी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. त्याबाबत मा.विधान सभा सदस्य महोदयांना महानगरपालिकेकडून दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच मा. आमदार महोदयांच्या प्राप्त तक्रारी नुसार मक्तेदारास रस्ता दुरूस्ती बाबत दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मनपाने सुचना दिलेल्या असून वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत. दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये रस्ता दुरुस्तीचे काम झाल्या शिवाय कोणत्याही प्रकारचे नविन भुयारी गटार पाईप लाईन टाकण्याचे काम हाती घेऊ नये. याबाबत देखील मक्तेदारास पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच तक्रार प्राप्त झाल्यापासुन मक्तेदाराचे कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाहीत.

(३) योजना प्रगतीत असुन, शहरात विविध भागात कामे सुरु आहेत. भुयारी गटारामुळे खराब होणारे रस्ते हे लगेच दुरुस्त करणे हे तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याने सदरचे रस्त्यांचे नैसर्गिक कॉम्पेक्शन करीता विहित कालावधी देणे आवश्यक आहे. रस्ता दुरुस्तीपुर्वी वापरण्या योग्य रस्ता करण्यात येत आहे. उर्वरीत रस्ता दुरुस्तीचे कामे पावसाळ्यापुर्वी दुरुस्त करणेकामी नियोजन करण्यात आलेले आहे.

(४) व (५) रस्ता दुरुस्ती कामात योग्य प्रगती न आढळल्याने मंजुर मक्तेदारास दंडात्मक कार्यवाही संबंधी नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. तसेच आयुक्त व शहर अभियंता यांनी योजनेच्या कामाबाबत वेळोवेळी आढावा बैठका घेतलेल्या आहेत. सद्य:स्थितीत ज्याभागात रस्त्यांचे कामे मंजुर आहेत त्याच भागात भुयारी गटर योजनेचे कामे

सुरू ठेवुन इतर शहरातील कोणत्याही भागात भुयारीगटारचे कामे सुरू न करण्याचे सुचना मक्तेदारास देण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरू आहे.

---

**नाशिक केंद्र सरकारच्या अमृत २.० योजनेतून मंजूर पाणीपुरवठा निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(२३) ३२३१ (२३-०४-२०२५). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक केंद्र सरकारच्या अमृत २.० योजनेतून मंजूर २८६ कोटीच्या पाणीपुरवठा निविदा प्रक्रियेत विशिष्ट कंपन्यांना पात्र ठरवताना या निविदेत सहभागी होण्यासाठी सात कंपन्यांनी जिओ टॅग घेतला परंतु दोन कंपन्यांनीच अंतिम निविदा दाखल केल्याने सदर निविदा थांबवून पुर्ननिविदा काढण्यात येणार असल्याची बाब माहे जानेवारी २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्याबरोबरच गांधीनगर व शिवाजीनगर जलशुद्धीकरण केंद्राच्या दुरुस्तीसाठी केंद्र शासनाच्या अमृत २.० योजनेतून २८६ कोटी रुपयाचे काम मंजूर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर वाढीव लोकसंख्येच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची असल्याने यात सात कंपन्यांनी तयारी दाखवली आहे त्या सर्व कंपन्यांना अमृत २.० योजनेत सर्व अटी शर्तीसह सामावून घेण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत नाशिक शहराच्या रुपये ३४२.५४ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया नाशिक महानगरपालिकेमार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राबविण्यात आली असून प्रथम निविदेच्या वेळेस एकाच निविदा धारकाने सहभाग नोंदविल्यामुळे वेळ वाढवून दिला असता दोन निविदा प्राप्त झाल्या तथापि, दोन्ही निविदा धारक तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरल्या.

तद्नंतर, जिओ टॅगिंग ची अट रद्द करून फेरनिविदा राबविली असता पाच निविदा प्राप्त झाल्या तथापि, पाचही निविदा धारक तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरल्यामुळे सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत जास्तीत जास्त निविदाधारकांना सहभागी होता यावे यासाठी सदर प्रकल्पाची पुनःश्च फेरनिविदा अंशतः बदल करून नाशिक महानगरपालिकेमार्फत राबवली असता एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी तांत्रिक छाननी अंती १ निविदाधारक अपात्र ठरला आणि उर्वरित ४ पात्र निविदा धारकापैकी ९.९९% कमी दराच्या न्यूनतम दराच्या निविदाधारकास नाशिक महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आले असल्याचे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेने घरगुती पाणीपट्टीत दुपटीने वाढ केल्याबाबत**

**(२४) ३३०२ (०१-०५-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर शहराच्या पाणीपुरवठा योजना व वितरण व्यवस्थेवर होणाऱ्या खर्चात दरवर्षी मोठया प्रमाणावर वाढ होत असल्याने पाणी योजनेवरील खर्चातील तूट भरुन काढण्यासाठी घरगुती पाणीपट्टीत दुपटीने वाढ

करण्याचा निर्णय संबंधित महानगरपालिकाने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहिल्यानगर महानगरपालिकाने सन २००३ मध्येही पाणीपट्टीमध्ये वाढ केली होती तेव्हापासून अर्धा इंच नळ जोडणीसाठी १५०० रुपये दर आकारला जात असल्याने येथील नागरिकांना आर्थिक फटका बसत आहे त्यातच नव्याने पाणीपट्टीत वाढ करण्याच्या निर्णयामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पाणीपट्टी दरात केलेली वाढ कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २००३ ला दरवाढी बाबत निर्णय घेऊन तत्कालीन परिस्थितीत घरगुती पाणी ग्राहकांची (अर्धा इंची नळ जोडणी करिता) रु. १५००/- इतकी पाणी पट्टी लागू केलेली होती. व तेव्हापासून आजतागायत २१ वर्षे इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतरही पाणी पट्टीचा तोच दर कायम आहे. स्थायी समिती ठराव क्र.३६२ दिनांक ०७.०१.२०२५ अन्वये १/२ "नळ जोडणीसाठी रु.३०००/- पाणी पट्टीचा निर्णय घेतल्याने नागरिकांचे निवेदन प्राप्त झाले होते. निवेदने विचारार्थ घेवून महासभा ठराव क्र.१०८ दिनांक १५.०१.२०२५ अन्वये १/२ "नळ जोडणीसाठी रु.२४००/- इतकी पाणी पट्टी करण्यात आली आहे.
(३) शहर पाणी योजने पोटी वीज वितरण कंपनीचे दर महिन्याची वीज बीले वेळेत अदा होत नसल्याने शहर पाणी पुरवठा योजनेची वीज देयके वेळेत भरणेस वांरवार अडचणी निर्माण होत आहे. वीज देयके वेळेत न भरली गेल्यास भविष्यात वीज कपातीचे संकट कायम आहे. अशा परिस्थितीत घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि. सोलापूर) नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देण्याबाबत

**(२५) ३३४४ (०१-०५-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि. सोलापूर) मतदारसंघातील कुर्डूवाडी नगरपरिषदेस पाणीपुरवठाची पाईपलाईन बार्शी व कुर्डुवाडी शहरांच्या पाणीपुरवठ्याची संयुक्त पाईपलाईन असून सदर पाईपलाईन जीर्ण झाल्याने पाणीपुरवठा करताना वारंवार होत असलेली गळती, शहरातील मोठ्या प्रमाणावर होणारी लोकसंख्याची वाढ तसेच रेल्वे प्रशासनाकडून नगरपरिषदकडे होत असलेली नियमित पाणीपुरवठाची मागणी यामुळे नागरिकांना अनियमित व अपुरा पाणीपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरोत्थान महाभियानंतर्गत कुर्डूवाडी नगरपरिषदेचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा रु.११५.९९ कोटी किमतीचा प्रस्ताव तसेच अमृत २.० अभियानांतर्गत करमाळा नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेचा रु.८२ कोटी रकमेचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालया मार्फत शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी व निधी उपलब्ध करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावास मंजुरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) नगरोत्थान महाभियानंतर्गत कुर्डूवाडी शहराचा रुपये ११५.९९ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव या अभियानंतर्गत गठित राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीच्या दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

तसेच, नगरोत्थान महाभियानंतर्गत करमाळा शहराचा रुपये ८५.५२ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत दोन्ही प्रकल्पांच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिस्सा उभारण्याची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या अभियानंतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन याबाबत शासन स्तरावरील निर्णय घेण्यात येईल.

---

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान(राज्यस्तर) अंतर्गत करमाळा (जि. सोलापूर) शहर रस्ते विकास प्रकल्पास मंजुरी व निधी मिळणेबाबत**

**(२६) ३४१७ (२७-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) नगरपरिषद हद्दीतील रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झाले असून शहरात बाजार समिती, शाळा, महाविद्यालय, व्यापारीपेठा व रुग्णालयात तालुक्यातून येणाऱ्या ग्रामस्थांना रहदारीस प्रचंड अडथळा निर्माण होत असून अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, करमाळा नगरपरिषद हद्दीतील ५३ रस्त्यांच्या नकाशे आराखडे, अंदाजपत्रकांसह रु.७२,३८,७९१/- किमतीचा रस्ते विकास प्रकल्पाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे सदर प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांच्या मागणीवर शासनाने स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) नगरोत्थान महाभियानांतर्गत करमाळा शहराचा रस्ते विकास प्रकल्पाचा प्रस्ताव करमाळा नगरपरिषदेने विहित मार्गाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर केला आहे.

करमाळा शहरातील पाणीपुरवठा, मलनिःस्सारण बाबतची सद्य:स्थिती व प्रस्तुत प्रकल्पाच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिस्सा उभारण्याची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या महाभियानांतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन याबाबत शासन स्तरावरील निर्णय घेण्यात येईल.

---

## गोदावरी ( जि. नाशिक ) नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(२७) ३७७८ (०१-०५-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी (जि. नाशिक) नदीचे प्रदूषण रोखण्याकरिता नागरिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करण्याचे मा. उच्च न्यायालयाने अधोरेखित केल्यानंतर एका संस्थेने सात महिन्यापूर्वी महानगरपालिकेला या संदर्भातील सर्व खर्च उचलण्याची तयारी दर्शविली असतांना तत्कालिन आयुक्तांनी या अर्जाची दखल घेतली नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित तत्कालिन आयुक्तावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर संस्थेच्या अर्जावर शासनाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) पोदार इंटरनॅशनल स्कूल, नाशिक या संस्थेने दिनांक २६.०७.२०२४ रोजी अर्ज करुन शाळेजवळ असलेल्या नंदीनी नदीच्या किनारी २०० मिटर परिसरात जनजागृती व प्रबोधन करणेबाबत पत्र व्यवहार केलेला होता.

त्यानुसार गोदावरी संवर्धन कक्षामार्फत नियम व अटीशर्तीचे अधिन राहुन उपक्रम राबविणेकामी सदरच्या संस्थेस दिनांक १०.०२.२०२५ चे पत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड शहरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(२८) ४२८१ (०१-०५-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीच्या पात्रात सांडपाणी सोडले जात असून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी ची वाढ झाली असल्यामुळे तसेच अन्य कचरा, घाण पाण्यात साचून नदीतील पाणी दूषित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीपात्रातील पाणी दूषित झाल्यामुळे पाण्यातील जीवसृष्टीला धोका निर्माण झाला असून डासांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीतील जलपर्णी काढून पाणी दूषित होणार नाही यासाठी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी नागरिकांसह, महानगरपालिका प्रशासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन गोदावरील नदीपात्रातील जलपर्णी काढून पाणी स्वच्छ करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये गोदावरी नदी वाहते. गोदावरी नदीतील जलपर्णी तात्काळ काढून पाणी दूषित होणार नाही यासाठी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांसह पर्यावरणप्रेमीनी महानगरपालिकेकडे केली होती. त्यास अनुसरून

महानगरपालिकेमार्फत जलपर्णी काढण्याचे काम यापूर्वी वेळोवेळी करण्यात आले आहे.

नांदेड शहरातून गोदावरी नदीच्या पात्रात जाणाऱ्या नाल्याच्या पाण्यावर उपाययोजना करण्यासाठी राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत गोदावरी नदीचे उस्माणशाही नाला / चुनाल नालाद्वारे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी १० दललि क्षमतेचे मलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झालेले असून सद्यस्थितीत चुनाल नाल्याचे पाणी नदी पात्रात मिसळत नाही.

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत नांदेड वाघाळा शहराच्या रुपये ३२९.१६ कोटी किंमतीच्या मलनिःस्सारण प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून सदर प्रकल्पाचे कार्यान्वयन झाल्यानंतर अशुद्ध पाण्यावर प्रक्रिया केल्याने गोदावरी नदीचे गोदावरी नदीचे पाणी अशुद्ध होणार नाही व पाण्यात जलपर्णी निर्माण होणार नाही.

तसेच, गोदावरी नदीमध्ये जाणाऱ्या नाल्याच्या पाण्यावर नांदेड वाघाळा महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत असल्याचे नांदेड वाघाळा महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करणेबाबत

**(२९) ४४८० (३०-०४-२०२५). श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन द्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पाईपलाईनला वारंवार गळती लागून लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार लागणाऱ्या गळतीमुळे नागरिकांना अपुऱ्या व खंडित पाणीपूरवठ्यामुळे पाणी टंचाईला सामोरे जावे सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह नागरिकांना नियमित पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन व्दारे पाणी पुरवठा करण्याच्या योजनेसाठी बिद्री सब स्टेशनपासून ३३ के.व्ही. उच्च दाब वाहीनीची ओव्हरहेड वायर वनविभागाच्या कार्यक्षेत्रामधून जात असुन झाडाच्या फांद्यांचा स्पर्श होऊन, भूस्खलन होऊन विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने पाणी पुरवठा खंडीत होतो. तसेच व्हॉल्वमध्ये कचरा येणे, व्हॉल्वच्या वेल्डींग जॉईंटमध्ये बिघाड होणे, व्ही.एफ.डी. यंत्रणेमध्ये बिघाड होणे यामुळे देखील काही काळ पाणी पुरवठा खंडीत होतो.

काही कारणास्तव पाणी पुरवठा खंडीत झाल्यास अशावेळी कामाची दुरुस्ती होईपर्यंत महानगरपालिकेकडून टँकरची सोय करुन प्रभावित होणाऱ्या भागामध्ये पाणी पुरवठा केला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरात तावडे हॉटेल ते शिवाजी पूल हा नवीन उड्डाणपूल उभारण्याबाबत

**(३०) ४४८३ (२३-०४-२०२५). श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातून कोकणासह जिल्ह्यातील इतर दुर्गम भागात जाण्यासाठी असणाऱ्या तावडे हॉटेल ते शिवाजी पूल या प्रमुख मार्ग शहराच्या मध्यवर्ती भागातून जात असल्याने या रस्त्यांवर वारंवार वाहतुकीची कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरील वाहतून कोंडी कमी करण्याऱ्यासाठी तावडे हॉटेल ते शिवाजी पूल दरम्यान उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने उड्डाणपूल लवकरात लवकर बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.केंद्रीय मंत्री, भूपृष्ठ वाहतुक व जहाज मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १७/०२/२०२५ रोजी कोल्हापूर शहराचा दौरा केला असून त्यावेळी विभागातील महामार्ग अनुषंगीक कामे व शहरातील वाहतुकीच्या समस्याबाबत जिल्हयातील लोकप्रतिनिधी यांचेसमवेत बैठक झाली. सदर बैठकीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ कोल्हापूर शहरातून जात असून तो राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ ला गांधीनगर-तावडे हॉटेल या ठिकाणी जोडला जात असल्याने या ठिकाणी होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी शिवाजी पुल ते गांधीनगर-तावडे हॉटेल दरम्यान उड्डाणपूल उभारण्याची मागणी केली. त्यावर मा.केंद्रीय मंत्री महोदयांनी उक्त कामाचा प्रकल्प अहवाल तयार करुन सन २०२५-२६ च्या वार्षिक योजना आराखडयामध्ये त्याचा समावेश करण्याचे निर्देश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिनांक २६/०५/ २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे तावडे हॉटेल ते शिवाजी पुल ते गगनबावडा रस्ता या दरम्यान प्रस्तावित उड्डाणपुलाचे सादरीकरण जिल्हयातील लोकप्रतिनिधी तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी यांना केले. तसेच वार्षिक बजेट मध्ये खर्चाची तरतूद करण्याचा प्रस्ताव दिल्ली येथील मुख्यालयास सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव ( जि.नाशिक ) कॅम्पातील हिम्मतनगर येथील महापालिकेची जलवाहिनी फुटल्याबाबत

**(३१) ४७४३ (०१-०५-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) कॅम्पातील हिम्मतनगर, श्री.स्वामी समर्थ केंद्रासमोरील महानगरपालिका आयुक्तांच्याच निवासस्थानाबाहेर महापालिकेची जलवाहिनी फुटल्याने त्यातून हजारो लिटर पाणी वाया गेल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी भुयारी गटारीचे काम करणाऱ्यांनी कोणतीही परवानगी न घेता जेसीबीच्या सहायाने खोदकाम केल्याने जमिनीतून गेलेली जलवाहिनी फुटली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास त्यानुषंगाने भुयारी गटाराचे काम परवानगी न घेता केलेल्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०८-२०२५) :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.
(३) व (४) मालेगाव शहरात अमृत २.० योजने अंतर्गत भुयारी गटार अंथरणेचे काम सुरु आहे. भुयारी गटार योजनेच्या मक्तेदारास कार्यादेश दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी पारित करण्यात आलेला आहे. महानगरपालिका आयुक्तांच्याच निवासस्थानाबाहेर काम सुरु करण्यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी मक्तेदारास नियोजन देण्यात आलेले होते. जेसीबीच्या सहाय्याने सिमेंट रस्त्याचे खोदकाम सुरु असतांना जमिनीतुन गेलेली जलवाहिनीचा अंदाज जेसीबी चालकास न आल्याने सदरची जलवाहिनी थोड्या प्रमाणात फुटलेली होती.

सदरची बाब व्हॉलमनच्या निदर्शनास आल्यावर तात्काळ पाणी पुरवठा बंद करण्यात व तातडीने सदरची लिकेज झालेली जलवाहिनी भुयारी गटारच्या मक्तेदारामार्फत दुरुस्त करुन नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा करण्यात आलेला असून, याबाबत तेथील भागातील नागरीकांची कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या सिडकोचे माजी विभागीय अधिकारी व सध्याचे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त यांचे गैरवर्तनाबाबत

**(३२) ५२८२ (०१-०५-२०२५). श्री.दिलीप बोरसे (बागलाण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या सिडकोचे माजी विभागीय अधिकारी व सध्याचे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त यांचे गैरवर्तना संदर्भात सन २०२० ते २०२४ दरम्यान अनेक तक्रारी शासनास व महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिकाऱ्याने मा. उच्च न्यायालयाचे मुंबई खंडपीठाच्या कार्यालयात उद्धट वर्तन केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी संबंधित उपायुक्त दिंडोरी, साक्री येथे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत असतांना त्यांची कारकिर्द वादग्रस्त असूनही प्रशासनाने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करून त्यांची चौकशी सुध्दा केली नाही त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सिडकोचे माजी विभागीय अधिकारी व सध्याचे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर तातडीने कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) संबंधीत अधिकारी हे साक्री तसेच दिंडोरी येथे मुख्यधिकारी या पदावर कार्यरत असताना त्या कालावधीतील अनियमित संदर्भात त्यांचे निलंबन करणे अथवा चौकशी करणे अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव अथवा तक्रारी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) संबंधीत सहा. आयुक्त तथा प्र. उपायुक्त (अतिक्रमण) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येवून नाशिक

महानगरपालिकेकडून खुलासा देखिल मागविण्यात आलेला आहे. त्यांचा खुलासा विचारात घेऊन कामकाजात कसुर होणार नाही या बाबत त्यांना ताकीद देण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक २० मार्च, २०२५ अन्वये त्यांची महानगरपालिकेत अन्यत्र पदस्थापना करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील आरोग्य विभागाकडे शवागार व शवविच्छेदन गृह अस्तित्वात नसल्याबबत**

**(३३) ५३४७ (०१-०५-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात जवळपास २० लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या आरोग्य विभागाकडे शवागार व शवविच्छेदन गृह अस्तित्वात नसल्यामुळे शहरातील हजारो नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिका आरोग्य संस्थांमध्ये शवागार आणि शवविच्छेदन गृह स्थापन करण्याची मागणी १४ वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात शवागारासाठी ३ रुग्णालयात प्रस्तावित केलेली कार्यवाही संथ गतीने सुरु असून शवविच्छेदन कक्षाकरिता एम.डी. फॉरेन्सिक मेडिसीन डिग्री असलेला वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची नेमणूक करून शवविच्छेदन गृह सुरु करण्याची मागणी समर्थन संस्थेने मा.उपमुख्यमंत्री, (नगरविकास) प्रधान सचिव नगरविकास, आयुक्त वसई विरार महानगरपालिका, जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत याबाबत चौकशी करुन शवगार व शवविच्छेदन गृह उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०८-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे,

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे शवागार उपलब्ध आहेत. परंतु शवविच्छेदनगृह उपलब्ध नाहीत. तथापि, महानगरपालिकेच्या क्षेत्रात जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील (१) ग्रामीण रुग्णालय, विरार, (२) प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर आणि (३) प्राथमिक आरोग्य केंद्र, सोपारा याठिकाणी शवविच्छेदनाची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे, नागरिकांची गैरसोय होत नाही.

(२) अंशत: खरे आहे,

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विराटनगर स्मशानभूमी, पाचूबंदर वसई (प.) आणि सोपारा सामान्य रुग्णालय, नालासोपारा (प.) या ठिकाणी शवागार उपलब्ध आहेत.

(३) खरे आहे,

(४) महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी यांचे शवविच्छेदन करण्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, सोपारा सामान्य रुग्णालय, नालासोपारा (प.) आणि श्री. जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार, विरार पूर्व या ठिकाणी आवश्यक त्या परवानग्या घेऊन शवविच्छेदन गृह तातडीने सुरू करण्यात येणार आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील वाहतूक कोडीला आळा घालण्यासाठी उड्डाण पूल व भुयारी मार्गाची निर्मिती करण्याबाबत**

**(३४) ५९५९ (०१-०५-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील वाहतूक कोंडीच्या ठिकाणी उड्डाण पूल व भुयारी मार्ग महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतून करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. नगर विकास मंत्री यांना नुकतेच निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोल्हापूर शहरातील उड्डाण पूलाचा प्रकल्पाचा प्रस्ताव नगरोत्थान अभियानांतर्गत अनुज्ञेयता महानगरपालिकेमार्फत तपासून, आवश्यक बाबींच्या पूर्ततेसह व स्वहिश्यापोटीच्या वस्तुस्थितीदर्शक वित्तीय नियोजनासह विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिश्याची रक्कम उभारण्याबाबतची आर्थिक स्थिती व या राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून या अभियानंतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन नवीन प्रकल्पाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल.

---

**मोहाडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत**

**(३५) ६१२८ (०१-०५-२०२५). श्री.राजू कारेमोरे (तुमसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी पुरवठयाच्या कामाचे कंत्राट रु.३२ कोटी राजश्री ग्रुप एन्ड कंपनी नागूपर यांना देण्यात आला असून गत ६ वर्षाचा काळ होऊनही योजनेचे काम संथ गतीने सुरु असून त्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर होत असल्याचे तर काही ठिकाणी कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देऊन सुध्दा त्यांनी आजपर्यंत कामाला सुरुवात केलेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोहाडी मधील रस्त्यांची दुर्देशा झाल्या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मोहाडीवासियांना (जि.भंडारा) सुरळीत पाणी पुरवठा होण्याबाबत शासनाने संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत मोहाडी शहराच्या रुपये ३०.२७ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काम पाहते. सदर प्रकल्पाची नगरपरिषद मार्फत निविदा प्रक्रिया राबवून मे. राजर्षि इन्फ्रा प्रोजेक्ट्स यांना दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर प्रकल्पातील ३२ किमी वितरण नलिकेपैकी २७ किमी काम पुर्ण झालेले असून १२ किमी वितरण नलिकेचे हायड्रॉलिक टेस्टिंग पुर्ण झालेले आहे. तसेच, वितरण नलिका पुरवठा करताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मंजूर यंत्रणेमार्फत तपासणी प्रमाणपत्र घेण्यात येत आहे. तसेच, बांधकाम विषयक कामांचे वेळोवेळी क्युब टेस्टिंग करून त्याबाबतचे प्रमाणपत्र देखील नगरपरिषदमार्फत घेण्यात येत आहे.

तसेच, सद्यस्थितीस प्रकल्पाचे काम ५०% काम पुर्ण झाले असून डिसेंबर, २०२५ पर्यंत प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

---

## काळवटी (ता. अंबाजोगाई, जि.बीड) येथील साठवण तलावाची उंची वाढविण्याबाबत

**(३६) ६७५० (०१-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) शहरासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत काळवटी साठवण तलाव उंची वाढ पाणी पुरवठा प्रकल्पास शासनाने मंजुरी दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद, अंबाजोगाई यांनी त्यांचे पत्र.क्र. १८४१ दिनांक १८/०२/२०२५ अन्वये सन २०२३-२४ च्या दरसूची (DSR) नुसार सदर प्रकल्पाचे रु.८.११ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रकास मंजुरीसाठी शासनास सादर केले आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अंदाजपत्रकास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रस्तावास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान महाभियान अंतर्गत अंबाजोगाई नगरपरिषदेच्या काळवटी साठवण तलाव उंचीवाढ बाबतच्या रुपये ३.३० कोटी किंमतीच्या प्रकल्पास दिनांक ०६ सप्टेंबर,२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

तद्नंतर, सदर प्रकल्पाच्या कामाचा सन २०२३-२४ च्या दरसूचीनुसार प्रस्ताव पाटबंधारे विभागाने तयार करून अंबाजोगाई नगरपरिषदेस सादर केला आहे.

सदर प्रस्ताव नगरोत्थान महाभियानाच्या कार्यपद्धतीनुसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत आवश्यक तांत्रिक बाबींच्या पूर्ततेसह विहित मार्गाने शासनास सादर झाल्यानंतर प्रस्तुत प्रकल्पाच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिस्सा उभारण्याची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक

स्वराज्य संस्थांकडून या महाभियानांतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन याबाबत शासन स्तरावरील निर्णय घेण्यात येईल.

---

**धनकवडी परिसरातील (जि.पुणे) साईबा हॉटेलमध्ये सिलिंडरमधून गॅसगळती होऊन आग लागल्याने एका कामगाराचा झालेला मृत्यू**

**(३७) ७६३२ (२०-०६-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील धनकवडी येथील साईबा हॉटेलमध्ये सिलिंडरमधून गॅसगळती होऊन आग लागल्याने एका कामगाराचा मृत्यू झाल्याचे दिनांक ३० मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी हॉटेलमालकाने गॅस सुरक्षा नियमांचे पालन न केल्यामुळे तसेच अग्निशमन प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यामुळे सदरहू दुर्घटना घडली असून यामध्ये हॉटेल शेजारील दोन दुकाने व त्यातील माल जळाला असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित हॉटेल मालकाने अग्निशमन प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्यामुळे त्याच्यावर कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या दुर्घटना पुन्हा घडू नये याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर घटनेच्या अनुषंगाने सहकार नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१२५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०६, ३२४ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालु आहे.

पुणे अग्निशमन दलाकडून वेळोवेळी गृह निर्माण सोसायट्या, शाळा, कॉलेजेस, मॉल्स, मल्टीप्लेक्सेस, रुग्णालये, झोपडपट्या, औद्योगिक वसाहती, शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी आग प्रतिबंधक उपाययोजनेच्या दृष्टीने व्याख्याने व प्रात्यक्षिके आयोजीत करून प्राथमिक स्वरुपात आग प्रतिबंधक उपाययोजनेची माहिती दिली जाते व आगीपासून बचाव करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजूरा (जि.चंद्रपूर) प्रलंबित प्रकल्पाची कामे पूर्ण करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(३८) ८०४८ (२४-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपूर) प्रलंबित प्रकल्पाची कामे पूर्ण करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी जलसंपदा मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

बेंडारा मध्यम प्रकल्प :- प्रकल्पाची एकुण किंमत रु.५५५.३३ कोटी इतकी असून जून, २०२५ अखेर रु.३२२.८८ कोटी खर्च झालेला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता रु.१२५.०० कोटी ची तरतूद उपलब्ध आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचे शिर्ष कामे ८०% पूर्ण झाले आहे.

तसेच बंद नलिका वितरण प्रणालीचे कामे ५०% पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. सदर प्रकल्प जून, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) डोंगरगाव मध्यम प्रकल्प व सोनापूर टोमटा सिंचन योजना यांचे बांधकाम पूर्ण झालेले असून सदर प्रकल्प व्यवस्थापन करीता व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरण करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पावर फक्त सिंचन व्यवस्थापन करण्याच्या दृष्टिने कामे हाती घेतले जातात. तसेच आवश्यक कामाकरीता लागणाऱ्या निधीची मागणी वार्षिक प्रापणसुचीमध्ये केली जाते. त्या उपलब्ध मंजुर निधीतुन सिंचनाचे व देखभाल दुरुस्तीचे कामे पार पाडली जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील अतिरिक्त भाडपेट्टा आणि थकीत सेवाशुल्क न भरलेल्या भूधारकांचे भूखंडवाटप सिडकोने रद्द केल्याबाबत

**(३९) ८१५७ (०८-०९-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील अतिरिक्त भाडपेट्टा आणि थकीत सेवाशुल्क भरण्यासाठी अभय योजना राबवूनही त्याला प्रतिसाद न देणाऱ्या भूधारकांविरोधात सिडकोने केलेल्या कारवाईत २ हजार कोटीच्या किंमतीचे १६ भूखंडधारकांचे भूखंड वाटप माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान रद्द करण्यांत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाटप केलेल्या भूखंडापैकी ऐरोली, कोपरखैरणे, वाशी, नेरुळ, बेलापूर, खारघर इ. ठिकाणचे भूखंड रद्द करण्यांत आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही भूखंड सिडकोने ज्या कारणाकरिता दिलेले आहेत, त्या कारणाकरिता वापरले जात नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१०-२०२५) :** (१), (२) व (३) नवी मुंबई व परिसरातील सिडकोने भाडेपट्ट्याने वितरीत केलेल्या जमीन विकासनाच्या अनुषंगाने बांधकाम व्यवसायाशी संबंधित अडचणी व इतर बाबींसंदर्भात निर्णय घेण्यासाठी सेवानिवृत्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी व सिडको संचालक मंडळाचे ठराव विचारात घेऊन सिडको महामंडळाच्या स्तरावर अभय योजना (Amnesty Scheme) राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. सदर अभय योजनेंतर्गत अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क, सेवा शुल्क व विकास शुल्क मध्ये ५०% सवलत देण्यात आली होती. सदर योजनेस दिनांक ३१.३.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर कालावधीमध्ये ज्या भूखंड धारकांनी अर्ज दाखल केल्यानंतर सिडको महामंडळाने परिगणीत केलेली अनुज्ञेय रक्कमेचा भरणा केला त्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात आला आहे.

सिडको महामंडळाने प्रचलित नियमानुसार नवी मुंबई मध्ये विविध प्रयोजनासाठी भुखंड भाडेपट्याद्वारे वाटप केले आहेत. भाडेपट्टा करारनाम्यानुसार दिलेल्या प्रयोजनासाठीच विहित कालावधीत बांधकाम पुर्ण करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक आहे. ऐरोली, कोपरखैरणे, वाशी, नेरुळ, बेलापूर, खारघर येथील काही भूखंडांवर बराच कालावधी उलटुन देखील विहित मुदतीत भुखंड विकसित न केल्याने, भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केल्याने करारनाम्यातील अटी व शर्तींचे भंग झाला असल्याने तसेच उक्त अभय योजनेंतर्गत भाग घेवून देय रकमेचा भरणा न केल्याने इ. कारणामुळे वाटप रद्द करून भुखंड ताब्यात घेण्यात आले आहेत. त्यामध्ये वाशी-६, ऐरोली-२, कोपरखैरणे-१, नेरुळ-१, बेलापूर-१, द्रोणागिरी-२ व खारघर-३ असे एकूण १६ भूखंडांचा समावेश आहे.

यातील बहुतांशी भुखंडधारकांनी मा. न्यायालयातून स्थगिती आदेश प्राप्त केले असून प्रकरणनिहाय तपासणी करुन पुढील कार्यवाही सिडको स्तरावर सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) क्षेत्रातील आरे दुग्ध वसाहतीचा सर्वागीण विकास करण्याकरिता या विभागातील बिगर आदिवासी झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४०) ८३२४ (०७-०८-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) क्षेत्रातील आरे दुग्ध वसाहतीचा सर्वागीण विकास करण्याकरिता या विभागातील बिगर आदिवासी झोपडपट्टीधारकांचे सर्वेक्षण करुन शासनाच्या नियमाप्रमाणे २०११ पर्यत संरक्षणाचा लाभ देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, बिगर आदिवासी झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याची मागणी मा.दुग्धविकास मंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावावर अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३०-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

आरे परिसराचा सर्वंकष विकास करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करुन येथील जागेचा पर्यावरण व पर्यटनच्या दृष्टीने विकास करण्याकरिता प्राथमिक मास्टर प्लॅन तयार करण्यात आलेला आहे.

आरे दुग्ध वसाहतीचा परिसर अतिक्रमणमुक्त करुन सदर जागेचा वापर सार्वजनिक हितासाठी करण्याकरिता उपाययोजना सुचविणे तसेच आरे वसाहतीतील रहिवाश्यांना (अतिक्रमणे सोडून) बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे हा हेतू आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील १५१३ दूध संस्था अवसानायात जावून १४१ संस्था दूध पुरवठयाअभावी बंद कराव्या लागल्याबाबत

**(४१) ८५६२ (०६-१०-२०२५). श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १५१३ प्राथमिक दूध उत्पादक संस्था अवसायानात गेल्याचे तर राज्यातील ३६ जिल्हयामध्ये सध्या १२ हजार ३६६ संस्था हया चालू स्थितीत असून त्यापैकी १४१ संस्था दूध पुरवठयापैकी बंद कराव्या लागल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक सहकारी दूध संस्थांची नोंदणी ही जिल्हास्तरीय सहकारी दूध संस्थेकडे करावी लागते व त्याबाबतची अट पूर्ण झाल्यावर काही संस्थांच्या नावाने बँकांसह अन्य वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन ते सभासद शेतकऱ्यांना गाय किंवा म्हैस घेण्यासाठी पैशाचे वाटप करण्यात येऊन त्यामुळे दूधाचे संकलन वाढण्यास मदत होते, असे सांगण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी संस्थांमध्ये वाढलेल्या अनागोंदी कारभारामुळे अनेक प्राथमिक संस्था बंद पडल्या असल्याचे तर तालुका आणि जिल्हा दूध संघही त्याच अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन प्राथमिक सहकारी दूध संस्था, तालुका व जिल्हास्तरीय संस्था वाचविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१२-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्यात एकूण १२३६६ प्राथमिक सहकारी दूध संस्था कार्यरत असून १४१ संस्था बंद व १५१३ प्राथमिक सहकारी दूध संस्था अवसायनात आहेत व एकूण ५४ तालुका सहकारी दूध संघ कार्यरत असून व १२ तालुका सहकारी दूध संघ अवसायनात आहेत. तसेच एकूण १६ सहकारी जिल्हा दूध संघ कार्यरत असून १ जिल्हा सहकारी दूध संघ बंद आहे. तसेच ७ जिल्हा सहकारी दूध संघ अवसायनात आहेत.

(२) होय, अंशत हे खरे आहे.

प्राथमिक सहकारी दूध संस्थांची नोंदणी ही जिल्हास्तरीय सहकारी दूध संस्थेकडे करण्यात येत नसून ती जिल्हास्तरीय सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) या कार्यालयाकडून होते. शासन निर्णय दिनांक ४.१.२००० मधील अटी व शर्तीनुसार नियोजित संस्थेने दूध संकलनाची अट पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ मधील तरतुदीनुसार करण्यात येऊन गावात नविन दूध संस्था नोंदणीबाबत निकष ठरविण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे आहे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परभणी शहरात नियोजन भवन इमारत उभारण्याबाबत

**(४२) ८५७१ (२९-०६-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरात (जि.परभणी) नियोजन भवनाची इमारत उभारण्याबाबत शासन आदेश जाहीर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नियोजन भवन उभारण्याबाबत निधी, जागा उपलब्धता व प्रत्यक्ष काम सुरू करण्याबाबत कोणती प्रक्रिया सुरू आहे, त्याचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१२-०८-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) नियोजन भवनासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात १९०० चौ.मी. जागा उपलब्ध आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांनी कामाचे सविस्तर अंदाजपत्रक दिनांक ०१/०७/२०२५ रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांचेकडे तांत्रिक मान्यतेस्तव सादर केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### प्रकल्पग्रस्तांना घराऐवजी आर्थिक भरपाई देण्याच्या एमएमआरडीएच्या धोरणाबाबत

**(४३) ८८५५ (२१-०६-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) पायाभूत सुविधा प्रकल्पातील प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी "एमएमआरडीए" ने सर्वसमावेशक आर्थिक ऐच्छिक भरपाई धोरण तयार केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्या धोरणानुसार निवासी-अनिवासी प्रकल्प बाधितांसाठी किमान २५ लाख रुपयांचा आर्थिक मोबदला मिळणार आहे, तर झोपडी धारकांना कमाल ४० लाख रुपये भरपाई मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एमएमआरडीएच्या या आर्थिक ऐच्छिक भरपाई धोरणास नुकत्याच झालेल्या प्राधिकरणाच्या १०९ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या धोरणानुसार प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचा मार्ग सुकर करण्याकरिता शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
सदरचे धोरण प्राधिकरणाचे महत्वाकांक्षी म्हणजे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) धोरणाअंतर्गत मान्यता असलेल्या प्रकल्पांसाठी लागू करण्यात आले आहे.
(२), (३), (४) व (५) प्रकल्पग्रस्तांना आर्थिक भरपाई देण्यासंबंधी एमएमआरडीए च्या आर्थिक ऐच्छिक भरपाई धोरणास नुकत्याच झालेल्या प्राधिकरणाच्या १५९ व्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना आर्थिक भरपाई देण्याच्या धोरणास मान्यता देण्यात आली आहे.
निवासी वापराबाबत अधिकृत निवासी बांधकामे व खाजगी भूसंपादन करावयाचे जमिनीवरील बांधकामे यांना अर्थिक मोबदल्याची किमान रक्कम रू.२५ लाख तर मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) अंतर्गत संरक्षणपात्र पायाभूत सामाजिक आर्थिक सर्वेक्षण (BSES) अहवालामधील बाधित संरक्षण पात्र निवासी बांधकामे यांना आर्थिक मोबदला किमान रक्कम रू.२५ लाख व कमाल रक्कम रू.४० लाख देण्यात येईल.

तसेच अनिवासी वापराबाबत झोपडपट्टी नसलेल्या व्यावसायिकांसाठी भरपाईची रक्कम ही त्यांचे पात्र क्षेत्र X तळमजल्यावरील व्यावसाईक दुकानांचा सिध्दगणक दर यानुसार परिगणित केली जाईल आणि झोपडपट्टी असलेल्या व्यावसायिकांसाठी भरपाईची रक्कम ही त्यांचे पात्र क्षेत्र किंवा २२५ चौ. फूट यापैकी कमी असलेले क्षेत्र X तळमजल्यावरील व्यावसाईक दुकानांचा सिध्दगणक दराच्या ०.७५ प्रमाणात असेल.

प्राधिकरणाच्या आर्थिक ऐच्छिक भरपाई धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांनी मागणी केल्यास त्यांना आर्थिक मोबदला देणेचे प्रस्तावित आहे.

---

**नवी मुंबईतील वाशी येथे कोपरी गावाजवळ सेक्टर २६ येथील व्यापाऱ्यांकरिता राखीव असलेल्या भूखंडावर सिडकोने जप्ती केल्याबाबत**

**(४४) ९५९७ (१९-०९-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील वाशी येथे कोपरी गावाजवळ सेक्टर २६ नजीक ३८ हजार मीटरपेक्षा अधिक क्षेत्राचा मोकळा भूखंड हा व्यापाऱ्यांकरिता राखीव असून या भूखंडावर मोठे संकुल उभारण्यात येणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर सिडकोच्या करारानुसार विहित मुदतीत बांधकाम करणे आवश्यक होते मात्र संबंधित व्यापारी संस्थेने बांधकाम न केल्याने सिडकोने जप्तीची कारवाई केली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोने दिलेल्या भूखंडावर वर्षानुवर्षे बांधकाम न केल्याने आणि भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केल्यामुळे महामंडळाने कोपरखैरणे, वाशी, नेरूळ, ऐरोली, बेलापुर, उलवे, द्रोणागिरी व खारघर असे एकूण १६ भूखंड जप्त केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त जप्त केलेल्या भूखंडाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१०-२०२५) :** (१) व (२) नवी मुंबई मर्चंट कॉमन वेअर हाऊस या संस्थेला वेअर हाऊस, कोल्ड स्टोअरेज व इतर वापरासाठी वाशी येथील सेक्टर १९-F मधील भुखंड क्र.१, क्षेत्र २५०३३.७० चौ.मी. व भुखंड क्र.५, क्षेत्र १३१७२.८४ चौ.मी. हे भुखंड दिनांक १८.५.१९९८ रोजी भाडेपट्टा करारनामे करुन वाटप करण्यात आले आहेत. सदर करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार करारनाम्यापासून ५ वर्षात बांधकाम पूर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक होते. सदर मुदतीत बांधकाम पूर्ण न केल्यास अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आकारुन बांधकामास मुदतवाढ देण्याचे सिडको महामंडळाचे धोरण आहे.

दरम्यान, सदर अतिरिक्त भाडेपट्टा शुल्कावर ५०% सवलत देण्याबाबत सिडको स्तरावर शासन मान्यतेने दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत "अभय योजना" राबविण्यात आली होती. सदर योजनेमध्ये उक्त संस्थेने अर्ज सादर केला होता. त्यानुषंगाने सिडकोमार्फत विषयांकीत भूखंडांसाठी परिगणित केलेली देय रक्कम भरणा करणेबाबत संस्थेस कळविले होते तथापि, सदर रकमेचा भरणा न केल्याने व विहित मुदतीत भूखंड विकसित करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केल्याने दिनांक १.४.२०२५ रोजी सदर भूखंडांचा करारनामा रद्द करुन दिनांक ७.४.२०२५ रोजी भूखंडाचा ताबा घेण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत, सदर कारवाई विरुध्द भूखंड धारकाने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.५६२५/२०२५ दाखल केली असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) हे खरे आहे.

नोडनिहाय वाशी-६, ऐरोली-२, कोपरखैरणे-१, नेरुळ-१, बेलापूर-१, द्रोणागिरी-२ व खारघर-३ असे एकूण १६ भूखंडांचे प्रथम टप्प्यात करारनामे रद्द करुन सिडकोमार्फत ताबा घेण्यात आला आहे.
(४) भाडेपट्टा करारनाम्यातील अटी / शर्ती व अभय योजनेनुसार सिडकोने नियमानुसार कार्यवाही केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील भिवंडी ते ठाणेपर्यंत महानगरपालिकेच्या पाईप लाईनच्या वरील जमिनीवर रस्ता प्रस्तावित करण्याबाबत

**(४५) १०५६४ (१५-०७-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील भिंवडी परिसर अधिसुचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेअतर्गत भिवंडी ते ठाण्यापर्यंत महानगरपालिकेच्या पाईपलाईन वरील जमिनीवर रस्ता प्रस्तावित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिंवडी परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेअतर्गत भिवंडी ते ठाणेपर्यंत महानगरपालिकेच्या पाईप लाईनच्या वरील जमिनीवर रस्ता प्रस्तावित करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आदेश देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) मा. लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत येवई महासंतुलक जलाशय ते कशेळी दरम्यान पाणी पुरवठा पाईप लाईन जमिनी खालून जल बोगदा च्या माध्यमातून करण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे अस्तित्वातील पाईप लाईनद्वारे होणारा जल पुरवठा हा जल बोगद्याद्वारे जमिनी खालून गेल्यास भिवंडी ते ठाणे पर्यंत महामार्गास पर्यायी रस्ता केला जाऊ शकतो. व ज्यामुळे भिवंडी परिसरातील वाहतूक कोंडी समस्या कमी होऊ शकते. यासंदर्भात प्राधिकरणाद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस आपले अभिप्राय देण्याची विनंती दिनांक २६.०६.२०२४ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. त्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १० सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पत्राद्वारे उक्त अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेमध्ये ठाणे ते वडपे पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या पाणी पुरवठा पाईपलाईन खालील जमिनी दिर्घ कालावधीसाठी उपलब्ध होणार नसल्याने व जल सुरक्षेची बाब विचारात घेता, मुंबई-नाशिक महामार्गास समांतर पर्यायी डी. पी. रस्ता प्रस्तावित करणे सद्यःस्थितीत तांत्रिकदृष्टया संयुक्तीक होणार नाही. असे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे स्पष्ट केले आहे.

---

## नवी मुंबईतील खारघर मधील महत्वाकांक्षी सेंट्रल पार्कची झालेली दुरवस्था

**(४६) ११४२५ (१८-०९-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील खारघर मधील महत्वाकांक्षी सेंट्रल पार्कची दुरवस्था झाल्याने स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असल्याची बाब माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लंडनच्या हाइ पार्कच्या धर्तीवर सिडकोने खारघरमध्ये उभारलेले सेंटर पार्कची दुर्दशा झाल्याने १५ वर्षात सिडकोने साधे फूड कोर्ट सुरू केले नसतानाच अनेक प्रसाधनगृह, पाणपोई बंद असल्याने स्मार्ट हटची स्थिती बिकट झाली असून देखभालीअभावी महत्वाकांक्षी प्रकल्पाचे खंडरमध्ये रूपांतर होत असून नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-१०-२०२५) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

खारघर येथील सेंट्रल पार्क हा सेक्टर-२३, २४ व २५ येथील ८० हेक्टर परिसरात प्रस्तावित आहे. सेंट्रल पार्कच्या फेज-१ मधील सेक्टर-२३ च्या सुमारे ३३ हेक्टर जागेपैकी विकसित क्षेत्र सुमारे २२ हेक्टर असून उर्वरित ९.८६ हेक्टर क्षेत्र मनोरंजन पार्क, फिरणारे रेस्टॉरंट आणि क्लब हाऊस व इतर उपक्रमांसाठी लंडनच्या हाईट पार्कच्या धर्तीवर राखीव ठेवण्यात आले आहे.

सदर उद्यानाचा फेज-१ मधील विकसित क्षेत्र २२ हेक्टर सन २०१० पासून जनतेसाठी खुले आहे. सदर उद्यानात लहान मुलांना खेळण्यासाठी खुले नाट्यगृह हिरवळीचे क्षेत्र, योगसाधना उद्यान, फुड कोर्ट, आर्बर, प्रसाधनगृह व पाणपोई इ. उभारणी केली आहे. तथापि, सेंट्रल पार्कला भेट देणा-या नागरिकांची संख्या कमी असल्याने ६ फुड कोर्ट, काही प्रसाधनगृहे व पाणपोई बंद ठेवण्यात आली होती. सद्यस्थितीत, ४ प्रसाधनगृहे सुरु असून फुड कोर्ट बंद आहेत.

सद्यस्थितीत, सेंट्रल पार्कची स्ट्रक्चरल दुरुस्ती, मार्गांची दुरुस्ती, फुड प्लाझा, पिण्याच्या पाण्याचे कारंजे, विश्रांती कक्ष, अँफीथिएटरची आवश्यकता विचारात घेऊन सेंट्रल पार्कमध्ये आवश्यक फलोत्पादन कामे, सेंट्रल पार्कचे पुनरुज्जीवन आणि विद्यमान संरचना, सिंचन प्रणालीची दुरुस्ती, विद्युत कामे, मुलांसाठी खेळण्याची उपकरणे, कारंजे इ. सोई-सुविधांचा सर्वसमावेशक प्रस्ताव सिडकोच्या विचाराधीन आहे. तसेच, संपूर्ण सेंट्रल पार्कमध्ये ३ वर्षांच्या कालावधीसाठी (नागरी, देखभाल आणि उद्यान देखभालीसह) व्यापक देखभालीचा प्रस्ताव सिडको स्तरावर प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आनंदपुर (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील सिलिंग जमीन भोगवठदार वर्ग २ मधून भोगवठदार वर्ग १ मध्ये रूपांतरित केल्याबाबत**

**(४७) ११६८६ (१९-०८-२०२५). श्री.विलास भुमरे (पैठण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आनंदपुर (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील श्री.जनार्दन विठोबा सोनावणे यांनी धारण केलेली गट क्रमांक १३३ मधील क्षेत्र ०० हेक्टर ४१ आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर २० आर सिलिंग भोगवठदार वर्ग २ जमीन भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याबाबत निवासी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अर्जदार यांचा अर्ज शासन निर्णय क्रमांक मशेम-२०२०/प्र.क्र.५०/ल-७, दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी दांगट समिती यांच्या शिफारशीनुसार अधिमूल्य निश्चित झाल्यानंतर सदर अर्जाच्या अनुषंगाने आदेश पारित करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, सिलिंग जमीन भोगवठदार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये करण्याचे अधिकार निवासी जिल्हाधिकारी यांना आहेत काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त अर्जाच्या अनुषंगाने आदेश देण्यात आले असतील, तर ते रद्द करुन निवासी जिल्हाधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही

महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २१ अन्वये अतिरिक्त घोषित केलेल्या जमिनीपैकी उक्त अधिनियमातील कलम २७ अन्वये भूमिहीन, माजी सैनिक व इतर यांना धारणाधिकार वर्ग-२ नुसार वाटप केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारातून भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकारात रुपांतरीत करण्याकरिता रुपांतरण अधिमूल्य, अधिकारिता आणि कार्यपध्दती याबाबत नियम तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) उक्त प्रकरणी चौकशी करून अहवाल शासनास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक ०१.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील ९२ सहकारी दूध उत्पादक संस्थांची नोंदणी सहायक निबंधकांनी रद्द केल्याबाबत

**(४८) १२१६८ (०६-१०-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील ९२ सहकारी दूध उत्पादक संस्थांची नोंदणी सहायक निबंधकांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये रद्द केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थांची नोंदणी रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, जिल्हयातील ७० टक्के दूध संकलन खासगी डेअऱ्या करीत असल्याने सहकारी दूध संस्थाची अवस्था दयनीय झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहकारी दूध संस्थांच्या विकासाकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१२-११-२०२५) :** (१), (२) व (३) होय, अंशतः खरे आहे.

सांगली जिल्हयामध्ये माहे मार्च २०२५ मध्ये एकूण ९२ सहकारी संस्थांची (पदूम) नोंदणी रद्द करण्यात आली होती. त्यामध्ये एकूण ५२ दुध उत्पादक सहकारी संस्था आहेत व उर्वरीत संस्था या शेळी-मेंढी पालन व कुक्कुटपालन या प्रकारातील आहेत.

ज्या दुध उत्पादक सहकारी संस्थांचे दूध संकलन कामकाज बंद आहे व ज्या संस्था उपविधीत नमुद ध्येय, धोरणे व उद्देशानुसार कामकाज करीत नाहीत अशा दूध उत्पादक संस्थांना आदेश बजावण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील गोरेगांव (पूर्व) आरे दुग्ध वसाहत येथील पिकनिक स्पॉटचे व्यापारीकरण होत असल्याबाबत

**(४९) १३२०२ (०७-१०-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रात गोरेगांव पूर्व आरे दुग्ध वसाहत येथील सहलीच्या ठिकाणी (पिकनिक स्पॉटचे) व्यापारीकरण करुन तेथील गतवैभव नष्ट करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी खाजगी गाडया पार्किंग करिता उभ्या केल्या जात असून त्याठिकाणी पार्किंग तळ निर्माण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

आरे दुग्ध वसाहतीमधील पिकनिक पॉईन्ट उद्यान हे शासन मान्यतेने ई-निविदेव्दारे सन २०२२-२०२७ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता प्रती माह रु.२.३१ लक्ष या दराने (प्रती वर्षी १० टक्के दरवाढ) प्रवेश शुल्क वसुलीचा ठेका दिलेला आहे.

(२) हे खरे नाही.

आरे दुग्ध वसाहतीमधील पिकनिक पॉईट उद्यानामध्ये सद्य:स्थितीत खाजगी गाड्या पार्किंग करिता उभ्या केल्याचे व त्या ठिकाणी पार्किंग तळ निर्माण केल्याचे निदर्शनास येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्म शताब्दी वर्षानिमित्त विविध ठिकाणी बांधण्यात आलेल्या इमारती संस्थेकडे हस्तांतरीत करण्याबाबत

**(५०) १३३७२ (१८-०८-२०२५). श्री.राजेश वानखडे (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्म शताब्दी वर्षानिमित्त मोझरी विकास आराखडा, वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा वलगाव विकास आराखडा व रुक्मिणी माता कौंडण्यपूर विकास आराखडा अंतर्गत यावली, वलगाव, वरखेड, कौडन्यपूर येथे तीर्थस्थळांची विकासकामे व अनेक शासकीय इमारती निर्माण करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दासटेकडी येथे ध्यान धारणाकेंद्र चित्रावली, ग्रामगीता प्रचार प्रसार केंद्र या इमारती निर्माण करण्यात आल्या होत्या परंतु अनेक वर्षाचा कालावधी होवूनही त्या अद्यापही संस्थेकडे हस्तांतरित झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतींचे बांधकाम निष्कृष्ट दर्जाचे झाल्याने दुरवस्था झाली असून त्या व्यवस्थित दुरुस्ती करून त्या सुस्थितीत हस्तांतरीत करण्याकरिता विभागीय आयुक्त अमरावती यांचे मार्फत हस्तांतरणाच्या प्रस्तावावर अद्यापही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, तद्नुषंगाने सदर इमारती संस्थेकडे सुस्थितीत हस्तांतरित

करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०८-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

आराखडयांतर्गत १. एकात्मिक , अध्यात्मिक, शैक्षणिक संकुल २. भक्तनिवास ३. ग्राम विकास प्रबोधिनी व ४. विशेष अतिथीगृह अशा चार इमारती निर्माण करण्यात आल्या आहेत.
(२) दासटेकडी येथे १. एकात्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक संकुल २. भक्तनिवास ३. ग्राम विकास प्रबोधिनी व ४. विशेष अतिथीगृह अशा चार इमारतींची कामे पूर्ण झालेली आहेत. त्या अद्यापही संस्थेकडे हस्तांतरित झालेल्या नाहीत.
(३) व (४) विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासन स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४.०७.२०२५ रोजी हस्तांतरणाच्या विषयावर बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार दुरावस्था झालेल्या इमारतींच्या दुरूस्तीसाठी लागणाऱ्या गरजेपुरत्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच दुरूस्तीची कामे पूर्ण झाल्यावर इमारतींचा उपयोग कोणत्या कामांसाठी व कसा करणार याचा तपशील देण्याबाबत संस्थेस निर्देश देण्यात आले आहेत. विभागीय आयुक्त, अमरावती कार्यालयाकडून सविस्तर तपशील प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.